महाराष्ट्र शासन

कालमर्यादा

क्रमांक- संकीर्ण-२०२० / प्र. क्र. २९ / सेवा-३
वित्त विभाग, तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १६.०९.२०२०

प्रति,

संचालक,
संचालनालय, लेखा व कोषागारे,
मुंबई

**विषय :-** अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनाबाबत

**संदर्भ :-** आपल्या कार्यालयाचे क्र:सलेको/कोषा/अधिसंख्य/उ.ले.-१/२०२० /१/१३९/१९४२, दि.१४.०८.२०२० रोजीचे पत्र.

महोदय,

वरील विषयी आपल्या संदर्भीय पत्रास अनुसरुन आपले लक्ष शासन निर्णय सा.प्र.वि. क्रमांक बीसीसी-२०१९/प्र.क्र.५८१/१६-ब, दि.१५.०६.२०२० मधील परिच्छेद क्रमांक ४ तसेच परिच्छेद क्रमांक ५ कडे वेधण्यात येत आहे. (सोबत, सदर शासन निर्णयाची प्रत सुलभ संदर्भासाठी जोडली आहे)

२. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४ व ५ मध्ये नमूद केल्यानुसार, अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना वार्षिक वेतनवाढ व अन्य सेवाविषयक लाभ अनुज्ञेय करावेत किंवा कसे ? याबाबत शासनाने गठीत केलेल्या अभ्यासगटाच्या शिफारशी, शासनास प्राप्त होणे अपेक्षित आहे. सदर शिफारशी प्राप्त होण्यास व त्या अनुषंगाने सुधारीत शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित होण्यास, किती कालावधी लागेल, हे ठामपणे सांगता येऊ शकत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी साप्रविकडून पुढील आदेश प्राप्त होई पर्यंत अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना दि.०१ जुलै, २०२० रोजीची वार्षिक वेतनवाढ व त्यानंतर पुढील कालावधीमध्ये येणाऱ्या वार्षिक वेतनवाढी अनुज्ञेय करता येणार नाहीत.

आपला,

(श्री.दे.लोंढे)
**अवर सचिव, वित्त विभाग**

**सोबत :- वरीलप्रमाणे**

निर्गमित केले
दिनांक : 16/9/2020
सही :



G:\SO सेवा-3\विविध विभागांशी संबंधित विषय पत्र.DOCX